# प्रकरण तिसरे

# कादंबरीकार वा.म. जोशी यांच्या 'आश्रमहरिणी' कादंबरीची प्रेरणा आणि रूपकात्मकता

# प्रकरण – ३

# कादंबरीकार वा.म. जोशी यांच्या 'आश्रमहरिणी' या कादंबरीची प्रेरणा आणि रूपकात्मकता

१९२० च्या दरम्यान आधुनिक मराठी वाङ्मयामध्ये निरनिराळ्या वाङ्मय प्रकारात जी निर्मिती झाली तिचे आता स्थूल समालोचन करावयाचे आहे. अर्थात हे समालोचन करताना पहिला मान कादंबरी या वाङ्मय प्रकाराला देणे हे समुचित आणि समर्थनीय आहे. कारण इतर वाङ्मय प्रकारांच्या मानाने हा वाङ्मय प्रकार लोकप्रियतेच्या आणि लोकजीवनाभिमुखतेच्या बाबतीत बराच आघाडीवर राहिलेला आहे असे साधार सिध्द करता येण्यासारखे आहे. आज या वाङ्मय प्रकारातील निर्मिती काहीशी मंदावल्या सारखी भासत असली आणि त्या दृष्टीने लघुकथा थोडीशी पुढे सरकल्यासारखी वाटत असली तरी तेवढ्यावरून सर्वसामान्य वाचकांच्या मनावरची कादंबरीची पकड कमी झालेली आहे असे निश्चित आणि एकदम अनुमान काढणे धाडसाचेच ठरणार आहे. मागील कालखंडातील कादंबरी विभागाचे साकल्याने अवलोकन केले तर मराठी कादंबरीला अद्भुत वातावरणातुन बाहेर काढून तिचा वास्तव सृष्टीत सन्मानपूर्वक प्रवेश करविणारे आणि तिचा उद्बोधन विषयक आणि कलात्मक प्रतिष्ठा फार मोठ्या प्रमाणात वाढविणारे तसेच १९२० दरम्यानच्या प्रस्तुत कालखंडातील मराठी कादंबरीकडे नजर वळविली म्हणजे तिच्या वैचारिक कलात्मक आणि प्रचारात्मक वैभवात मोलाची भर टाकणारे डॉ. केतकर, वा.म. जोशी, ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, भा.वि. वरेरकर, विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर असे कितीतरी नामवंत कादंबरीकार दृष्टी समोर येऊ लागतात. त्याच कोटीतले वा.म. जोशी यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करावयाचा आहे.

वा.म. जोशी हे महाराष्ट्रातले एक थोर विचारवंत. सत्यनिष्ठा ही त्यांच्या विचारशीलतेची प्रमुख आधारशक्ती, जॉन स्टुअर्ट मिल प्रमाणे सत्याची कास धरल्यामुळे नरकवास पत्करावा लागेल तरी मी तो पत्करीन ('to hell shall I go') अशा नि:संदिग्ध

शब्दात त्यांनी आपली सत्यनिष्ठा व्यक्त केलेली आहे. सत्य हे एकेरी, एकांगी, एकदेशीय असून त्याचा प्रकाश अनेक ठिकाणाहून अनंत दिशांतून येत असतो असा त्यांचाविश्वास आहे. त्यामुळे चर्चा विषयक प्रश्न कोणताही असो, वाङ्मयानंदाची कारणमिमांसा करण्याचा असो व 'पक्षभेद आणि पक्षद्वेष या सारख्या व्यावहारिक राजकारणाचा असो' या प्रश्नासंबंधी मोठ्या समरसतेने आणि तत्वजिज्ञासू वृत्तीने सर्वांगिण सत्यान्वेषण करतांना आढळून येतात. त्यांच्या या सत्यान्वेषणात सर्वत्र चतुरस्त्र-व्यासंगशीलतेचा प्रत्यय आल्याविना राहणार नाही. पण त्याच्या आस्वादात वाचकाला कटूतेचा वा अहंमान्यतेचा खडा कोटेही खटकावयाचा नाही. अभिजात सौजन्यामुळे आणि सुक्ष्म मार्मिक बुध्दीनिष्ठ विनोद परतेमुळे त्याचे सत्यावेषण साऱ्या चिकित्साप्रेमी सहृदयांच्या आत्मीयतापूर्ण आदरास पात्र झालेले आहे. सत्य हे स्वभावतः सुंदर आहे. त्यात स्वत:सिध्द असे एक प्रकारचे पावित्र्य व मान्यत्व असून ते उत्साहवर्धक व आनंददायक आहे अशी त्यांची श्रध्दा असली तरी निव्वळ रसिकतेच्या भूमिकेवरूनही त्यांनी अन्य हेतू निरपेक्ष अशा सौंदर्यपासनेची आणि कलाविलासाची महती मान्य केलेली आहे. अशा रितीने 'सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या सुसंगत तत्वत्रयीला त्यांच्या जीवनात महत्वाचे स्थान मिळालेले आहे.'[१]

अर्थात उपरोक्त तिन्ही तत्वांविषयी त्यांच्या निष्ठेत निश्चित तरतमभाव आहे. सर्वांगिण जीवन विकासाच्या दृष्टीने सत्य, सौजन्य आणि सौंदर्य हा तिन्ही तत्वांच्या आवश्यक असलेल्या समुचित सहकार्याचा त्यांनी वेळोवेळी पुरस्कार केलेला असला तरी सत्याच्या आणि त्याच्याच बरोबरीने सौजन्याच्याही आराधनेत त्यांनी जी साक्षेपशीलता आणि तन्मयता प्रकट केलेली आहे. तितकी ती त्यांनी सौंदर्योपासनेत आणि कलात्मक निर्मितीत व्यक्त केलेली आढळून येत नाही. सुव्यवस्था, समप्रमाणता, प्रमाणबध्दता, कार्यक्षमता, औचित्य, सुचकता इ. वाङ्मयीन सौंदर्याच्या विविध आवश्यक घटकांची त्यांना पूर्ण जाणीव आहे.एवढेच नव्हे तर त्या घटकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन त्यांनी इतरांच्या

ललितकृतीचे अत्यंत सूक्ष्म आणि कलानिष्ठ दृष्टीने परिक्षणही केले आहे. याचे दर्शन 'आश्रमहरिणी' मध्ये केले.

'आश्रमहरिणी' या कादंबरीत आधुनिक मराठी कादंबरीला नव्या तांत्रिक सौंदर्याची जोड करून दिलेली आहे. आश्रमहरिणी या कादंबरीत 'श्री पाराशर पुराणाची जुनी पोथी सापडावयाचा जो यशस्वी वास्तवभास उत्पन्न केलेला आहे.'[२] आणि त्या आभासाला पोषक असे आश्रमजीवनाचे जे प्रत्ययकारी चित्र त्यांनी रेखाटले आहे त्यात त्यांची कलात्मक चतुराईच प्रकट झालेली आहे.

वामनरावांच्या अंत:करणावर टेनिसच्या 'इनाक आर्डन' च्या अध्ययनाच्या झालेल्या सखोल संस्काराची साक्ष पटविणाऱ्या आश्रमहरिणीतील धौम्याचे आत्मकथन जितके रम्याद्भुत तितकेच वास्तवस्पर्शी आहे. धौम्य, गभस्तिगति, सुलोचना, 'पूर्णप्रज्ञ' कुलपति या आश्रमवासी स्त्री पुरूषांच्या जीवनांत अशी सात्विकता, पवित्रता आणि धार्मिकता आहे. तशीच मानवसुलभ विकारवशताही आहे हे पटवून देण्यासाठी 'आश्रमहरिणी' कादंबरी लिहिली आहे.

वा.म. जोशी यांनी 'आश्रमहरिणी' ही पौराणिक कादंबरी लिहिली आहे. 'आश्रमहरिणी' कादंबरीची कथा पुराणकालीन आहे पण प्रत्यक्ष पुराण नाही. तर वा.म. जोशी यांनी कल्पनेने पुराण निर्माण केलेले आहे. कल्पनेने निर्माण केलेल्या पुराणातून वास्तवभास निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सकृतदर्शनी पौराणिकतेचा आणि सामाजिकतेपासून अलिप्त असलेल्याचा आभास उत्पन्न करणाऱ्या 'आश्रमहरिणी'त धौम्य ऋषीच्या मुखाने पुनर्विवाह हा पुष्कळ वेळा 'आत्मोन्नतिकारक' कसा होऊ शकतो[3] हे सांगितले असून अपवादात्मक परिस्थितीत अपरिहार्य झाल्यामुळे त्यांनी द्विपतिकत्वाचे ही सौम्य समर्थन केलेले आहे. यासाठीच वा.म. जोशी यांनी 'आश्रमहरिणी' पौराणिक रूपकात्मक कादंबरी लिहिली असावी.

'आश्रमहरिणी' ही जरी पौराणिक कादंबरी लिहिली असली तरी तिच्या पाठीमागे सामाजिक दृष्टीकोनही महत्वाचा आहे. इंग्रजी राजवटीत मराठी वाङ्मयात कादंबरी जन्मास आली. तेव्हा इंग्रजी राज्य, इंग्रजी विद्या, इंग्रजाचे कायदे, ख्रिस्ती धर्माचा मिशनऱ्यांमार्फत होणारा जोराचा प्रसार इ. कारणांनी उद्भवलेले सामाजिक संक्रमण साक्षर जनतेला जाणवू लागले होते आणि शिकलेल्या लोकांनी अनिष्ट रूढी, परंपरा विरूध्द लढा सुरू केला. विधवा विवाह, पुर्नविवाह, स्त्रियांचे शिक्षण, वधुवरांचा संमती विवाह असल्या विषयांनी समाजसुधारकाचे मन भारावले आणि ते प्रत्यक्ष समाजात अंमलात आणण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले तर कथा-कादंबऱ्यांच्या द्वारे समाजाच्या तळापर्यंत पोहचण्यासाठी लेखकांनी प्रयत्न केला. त्यात वा.म. जोशी यांच्या आश्रमहरिणी मध्ये पुर्नविवाह व द्विपतिकत्वाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे सामाजिक परिस्थिती ही या कादंबरीची प्रेरणा होवू शकते.

**'आश्रमहरिणी' कादंबरीचे स्वरूप आणि रूपकात्मकता :-**

'आश्रमहरिणी' ही कादंबरी आकाराने केवळ एखाद्या दिर्घकथेएवढी आहे. परंतु वेगळ्या प्रकारची आहे. ती आकाराने केवळ एखाद्या दिर्घकथेएवढी आहे. परंतु पूर्ण विकसित कथानक, स्वभावचित्रण व कथेशी एकजीव झालेले. कथेच्या प्रकृतीने निर्मिले गेलेले वातावरण व कथेशी या तंत्रविषयक अंगाच्या दृष्टीने पाहिले तर ती एक स्वयंपूर्ण व यशस्वी कादंबरी आहे.[४] या कादंबरीला प्रारंभ आश्रमात झाला आहे, तेथे नारदांनी धौम्य ऋषींना विचारलेल्या स्त्रीधर्म विषयक प्रश्नाने सुरूवात होते. धौम्य ऋषींनी तो प्रश्न ऐकून डोळे मिटून क्षणभर ध्यान केले व नंतर लांब व दीर्घ उसासा टाकून अति गंभीर परंतु जरा उदास स्वराने म्हटलेख ''नारदा, तू तर त्रिकालज्ञानी आहेस. तुला सर्व धर्मशास्त्र विदित आहे. तेव्हां तुला मी काही नवीन सांगणार आहे असे नाही; परंतु तुझ्याबरोबर असलेल्या या अतुलप्रलाप पुण्यशील हिरण्यगर्भ राजाला मी (धौम्य ऋषींनी) आपली स्वतःची गोष्ट

सांगतो व ती या राजाने श्रवण केल्यानंतर आपण या विषयाचा सांगोपांग उहापोह करूं.[५]'' असे म्हणून धौम्य ऋषींनी आपली कथा सांगण्यास प्रारंभ केला.

पुढे धौम्य ऋषींनी आश्रमातील बालपणाचे जीवन सांगण्यास सुरूवात केली. रम्य बालपणातील व शशपाद, मृगप्लप्त, वेतमांग व गमस्तिगती या मित्रांच्या सहवासातील काही रम्य आढवणी सांगितल्या आहेत, त्यापैकी एक प्रसंगातून त्याच्यातील मैत्री प्रेमचा दिव्य अनुभव येतो तो प्रसंग –

आश्रमापासून दोन योजनांवर 'क्षीरोदक' नावाचे एक स्वच्छ सरोवर होते. त्यांच्या कांठी अंबिकेचे एक देऊळ होते. चैत्रमासी शुध्द सप्तमी, अष्टमी व नवमी या दिवशी त्या स्थानाचे मोठे माहात्म्य मानले इतके की, ते स्थान अरण्यांत असूनही त्या दिवसात तेथे पंधरावीस हजार यात्रा जमत असत. तेव्हा आश्रमातही हे तीन दिवस अनध्यायाचे समजत असत. त्यावेळी आश्रमांतील प्रौढ मुलांना घेऊन गुरूजी यात्रा पाहण्यासाठी जात. तेव्हा धौम्य ऋषी व त्याचे मित्र लहान होते, त्यांना यात्रेला जाण्यासाठी कुलगुरू परवानगी देत नव्हते. पण धौम्य ऋषी व त्यांच्या मित्रांनी कुलगुरूंना विनंती करून यात्रेला जाण्यासाठी परवानगी घेतली आणि सर्व मित्र परिवार गुरूजींच्या बरोबर यात्रेसाठी निघाला होता. पण पुढे थोड्या अंतरावर चालत गेल्यावर त्यांना आंब्याची झाडे दिसतात. त्या आंब्यांच्या झाडावर धौम्य ऋषी व त्यांचे मित्र चढले. धौम्य ऋषी खाली असलेल्या मित्रांकडे आंबे टाकत असताना हात निसटून निवडूंगाच्या काटेरी झाडीत पडले. तेव्हा तर गभस्तिगतीने स्वत: काट्यात उडी घेऊन व इतर मित्रांच्या मदतीने धौम्य ऋषीला काट्यांतून बाहेर काढले व त्यांच्या अंगात घुसलेले सर्व काटे काढून त्यांची सेवा व काळजी घेतली. अशा तऱ्हेने मित्रांनी केलेल्या मदतीने व गभस्तिगतीने केलेल्या धाडसाने गभस्तिगती व धौम्य ऋषी यांच्यातील मैत्री अधिक दृढ होते.

पुढे एके दिवशी चण्डप्रभ ऋषी आश्रम पाहण्यास येतात तेव्हा त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर धौम्य ऋषींनी योग्य व अचूक दिल्यामुळे धौम्य ऋषी कुलपती व जरत्कारू गुरू यांच्या दृष्टीने हुशार व बुध्दीमान विद्यार्थी होते.

धौम्य ऋषी व गभस्तिगती हे दोन्ही बालमित्रांनी नवयौवनात पदार्पण केले होते. तेव्हा या बालमित्राचे प्रेम एकाच मुलीवर म्हणजे जरत्कारू गुरूची नात सुलोचना हिच्यावर प्रेम बसते. सुलोचना ही खूप सुंदर व गुणवंत होती. तिचे केलेले वर्णन अतिशय मोहक होते.

धौम्य ऋषी म्हणतात - सुलोचना ही सुलोचना आणि इतर मुली त्या इतर मुली. तीची सर कोणाला यावयाची नाही. माधुर्याची ती मुर्ती होती. तिचे अवयव जितके कोमल तितकेच तिचे मन कोमल होते. तिचे शरीर जसे मोहक आणि मधुरधवल, तितकेच तिचे हृदयही प्रेमळ व शुध्द होते. तिचे भाषण म्हणजे गायन. तिच्या चेहऱ्यात साऱ्या जगतातील सौंदर्य भरले होते. फार काय त्या हरिणाक्षीच्या नयनांमध्ये सारे ब्रह्मंड भरले होते. तिच्या केशकलापाकडे पाहून मयूरांची स्मृति व्हावी. तिच्या नासिकेकडे पाहिल्यावर चंपककलिका डोळ्यांपुढे उभी रहावी; व तिच्या तनुबाहुयुगलांकडे पाहून कोमल लतांचा रम्य आभास व्हावा. तिचे स्तन कमंडलुसारखे होते आणि तिचे हृदय ऋषीसारखे शुध्द व निष्कलंक होते. तिचा विहार व विनोद ऋषिकुमारांप्रमाणे निरागस मधुर होता. होमाग्नीचे तिच्यांत पावित्र्य आणि तेज होते व तिच्या शब्दात वेदमंत्राचे सामर्थ्य होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ती आमच्या आश्रमाची अधिदेवताच होती.[७] अशा सुंदर व रूपवान सुलोचनेवर प्रेम करणाऱ्या धौम्य व गभस्तिगती मध्ये शत्रुत्व येण्याची वेळ येते. अशा परिस्थितीत गभस्तिगती स्वत: कुलपतीकडे जाऊन दुर्विलासी प्रेमाची हकीकत सांगितली. त्यावेळी कुलपतीनी केलेले मार्गदर्शन अतिशय महत्वपूर्ण होते.

**कुलपती व गभस्तिगती यांचा संवाद :-**

कुलपती म्हणाले, 'सुलोचना सुखी व्हावी अशी जर तुझी इच्छा असेल तर तुझ्याशी विवाह करून तिला अधिक सुख होईल का धौम्याशी, याचा नीट विचार करून पाहा. कोणाशी विवाह केला असता तिला अधिक सुख होईल असे तुला वाटते?'

यावर गभस्तिगती काहीच बोलला नाही. उत्तर मिळाले नाही असे पाहून ते म्हणाले,'गभस्तिगती, तुझ्यापेक्षा धौम्यावर तिचे अधिक प्रेम आहे अशी तुला शंका येते हेच ना तुझ्या मौनाचे कारण?'

'होय' असे गभस्तिगतीने म्हटले.

'तिच्या मुखाकडेच जर तुला पाहावयाचे असेल', कुलपती म्हणाले, 'तर तू हा नाद सोडून दिला पाहिजे. गभस्तिगति, चांगला विचार कर व विकारवश होऊ नकोस. मी तुम्हाला जो बोध केला आहे त्याला साजेसे वर्तन कर. इन्द्रियांचे दमन करण्यात खरे पौरूष आहे. पशुंप्रमाणे कामवश होऊ नको. या कामाच्या पायी तुम्ही बालमित्र वैरी होऊ नका. या कामापुढे स्नेह नाही, मैत्री नाही, गुरू नाहीत, लाज नाही, लज्जा नाही, असे जे म्हणतात ते खोटे आहे हे आपल्या वर्तनाने दाखवा.'

त्यांचा हा उपदेश ऐकून गभस्तिगतीने त्यांना म्हटले'मी कसे वागावे हे मला आपणच सांगावे, मी त्याप्रमाणे वागेन.' कुलपति म्हणाले, 'गभस्तिगती, तूं आपल्या मनाशीच विचार कर' असे त्यांनी म्हटल्यावर गभस्तिगती त्यांच्या उटजांतून बाहेर पडले आणि धौम्य ऋषीची भेट घेतली धौम्य ऋषीला घडलेला सर्व प्रकार सांगून त्यांना समजून सांगितले की सुलोचनेला धौम्य हाच योग्य पती आहे.' यावर धौम्य म्हणतात की, जरत्कार गुरू ज्यांच्या बरोबर सुलोचनेचा विवाह करतील ते योग्य होईल असा निर्णय धौम्य गभस्तिगती घेतात.

तर तिकडे जरत्कारू गुरू सुलोचनेपुढे विवाहाचा प्रस्ताव मांडतात पण ती पहिल्यांदा विरोध करते आणि शेवटी विवाह करण्यास तयार होते. तेव्हा जरत्कारू गुरू म्हणतात, 'सुलोचना आपल्या आश्रमातील गभस्तिगती आणि धौम्य हे विद्या संपूर्ण झाल्यावर तुझी

मागणी करणार आहेत, असे मला समजले आहे. तर त्यापैकी तुला कोण प्रिय आहे हे मला सांगून ठेव.' असे सांगितल्यावर कुणाला वरावे? या प्रश्नाने तर सुलोचनाचे हृदय द्विधा अवस्थेत होते. एकीकडे गभस्तिगतीवर तिचे खरे सात्विक प्रेम होते; कारण त्याचे शीलच तसे आदरणीय होते, पण दुसरीकडे धौम्याची विनोदप्रियता, उल्हासवृत्ती, बुध्दितेज, धौम्याचे धाडस इत्यादी गुणांनी धौम्याकडे तिचे राजस प्रेम तिला आकर्षत होते. गभस्तिगती हा तिला सूर्यासारखा वंदनीय होता. पण धौम्य तिला चंद्रासारखा कमनीय अथवा रमणीय वाटत होता.'[७] अशा या स्थितीत असल्यामुळे वाऱ्याने इतस्ततः हेलखावे खाणाऱ्या लतेप्रमाणे तिचे मन त्यावेळी दोलायमान होत होते. तेव्हा तिने कोणाला पसंत करावयाचे याविषयी उत्तर देताना तिने धौम्य ऋषींना निवडले. आणि जरत्कारू गुरूंनाही धौम्यच पसंत होते. अशा प्रकारे धौम्य व सुलोचनाचा विवाह होतो.

कुलपतीच्या आज्ञेने व जरत्कारू गुरूच्या इच्छेपोटी धौम्यऋषी व सुलोचना आश्रमात राहतात. धौम्य ऋषी आश्रमात अध्ययनाचे व अध्यापनाचे काम करतात. तर धौम्य ऋषीची सुशील आणि सुविनीत पत्नी आश्रमातील मुलाची सेवा करीत असे. अशा नवविवाहितांचा संसार सुखात चालला होता पण हे सुख फार काळ टिकले नाही.

या सुमारास अग्निमित्र राजा मरण पावला व त्याच्या मागून त्याचा पुत्र दिङःनाग हा राज्यावर अधिरूढ झाला. दिङ्ःनाग राजा फार वाईट होता. तो प्रजेचा छळ करीत असे. तो मांडलिक राजाकडून व प्रजेकडून अनेक प्रकारे द्रव्य वसुल करीत असे. आश्रमाकडून खंडणी वसूल करण्यासाठी आश्रमातील लोकांना त्रास देवू लागला म्हणून प्रथम त्या राजाच्या भेटीला गभस्तिगती जातात. तेव्हा तात्पुरता राजा थांबतो. पुढे दिङ्ःनाग राजा पुन्हा आश्रमातून खंडणीची मागणी करतो. त्यावेळी धौम्य ऋषी जातात.

धौम्य ऋषी राजवाड्यावर गेल्यावर राज्याच्या पोथ्या बनावट असे राजाला सांगतात तेव्हा दिङ्ःनाग राजाला राग येतो. म्हणून राजा धौम्यर्षिला बंदिवासात टाकतो. पुढे बंदिवासात टाकलेला धौम्यर्षि राजाला सांगतो की, राजदरबारात घडलेला प्रकार आश्रमात

सांगू नये. मग राजा त्याला वस्त्रसंकार देईल आणि कुलपतीला चतु:सहस्त्र निष्क दरवर्षी राजाला द्यायला सांगावे आणि असे जर केले नाही तर धौम्यर्षिला प्राणाला मुकावे लागले. म्हणून धौम्यर्षि राजाच्या कारस्थानाला तात्पुरता होकार देतात.पण राज्याने घेतलेल्या त्याच्या परिक्षेत अयशस्वी होतात म्हणून राजा त्यांना मातंगाकडून मारण्यास सांगतात. त्याचवेळी राजाचे मुख्य उपाध्याय धौम्यर्षिकडे येतात आणि राज्याच्या पोथ्यांबद्दल सर्व हकिकत सांगतात आणि धौम्यऋषींना सुवर्णालंकार देऊन त्यांना मारण्यास येणाऱ्या मातंगांना थांबण्यास सांगतात. याचप्रमाणे धौम्यऋषी जंगलात घेवून गेलेल्या मातंगाना सर्व प्रकार सांगतात व मातंगाना सुवर्णालंकाराचे अमिष दाखवतात मग ते मातंग त्यांना मारत नाहीत आणि जोपर्यंत राजा जिवंत आहे तोपर्यंत या जंगलातून बाहेर राज्यात न येण्याचे धौम्यऋषीकडून कबूल करून घेतात आणि ठरल्याप्रमाणे धौम्यऋषी दिङ्:माग राजा जिवंत आहे तोपर्यंत जंगलात तपश्चर्या करतात.

आश्रमात व सर्व राज्यात धौम्य ऋषींना वाघाने मारल्याची वार्ता पसरते. आश्रमात धौम्य ऋषीचे प्रेत, त्याचे जानवे व इतर त्यांच्या मृत्यूची ओळख पटणाऱ्या सर्व वस्तू पाठविल्या जातात. या गोष्टीने सर्व आश्रमावर शोककळा पसरते. सुलोचना विधवा होते. प्रिय मित्र गभस्तिगती हा तर फार दु:खी होतो. कुलपती व इतर गुरूंना खूप वाईट वाटते. पण कोणत्याही वाईट घटनेवर काळ हेच एकमेव औषध असते. काळाच्या ओघात प्रत्येकजण आपले दु:ख विसरण्याचा हळूहळू प्रयत्न करतात. शोक अवस्थेतील सुलोचनेचे वर्णन अतिशय महत्वपूर्ण होते. सुलोचना ही शोक-तमोवृत्त असली तरी ती शशिमुखी पौर्णिमेच्या रजनीप्रमाणे जनमनोहारिणी होती. हरिणाने कोमल पल्लव खाऊन टाकल्यामुळे एखादी लता जशी विकलांग व शुष्कप्राय होते आणि नंतर पर्जन्यकाळी टवटवीत होते, तशी तिची अवस्था झाली; किंवा रजनी जशी उष:काली मधुर औदासिन्य व रम्य शांतता धारण करते तसेच काही दिवसांपूर्वी शोकविव्हल झालेल्या सुलोचनाचीही मुखश्री लोकांना शांत व रम्य भासू लागली.

मित्र विरहाने दु:खी झालेल्या गभस्तिगती ही पूर्ववत नित्यनेम पाळू लागला. सर्व आश्रमातील लोक पुन्हा आनंदित होवून गेली. पण याच काळात एक विलक्षण बदल झाला. गभस्तिगती एवढा इन्द्रियदमन करणारा पण तोही अखेर विकारवश झालाच. मित्रासाठी (धौम्यऋषी) प्रेमत्याग करणारा त्याचा केवढा तो दिव्य स्वार्थत्याग! केवढा त्याचा तो इन्द्रिय-निग्रह! त्याची ती शान्त-गंभीर वृत्ती व त्याचा तो विद्याव्यासंग ही या समयी कोठे गेली होती.कोणास ठाऊक; पण त्यांचे मन या काळी विकारवश झाले खरे; तो धर्मज्ञ होता, नियतेंद्रिय होता; पण विवाह कल्पना त्यांच्या मनांतून काही केल्या जाईना. त्यांचे मन आवरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण वसिष्ठादि वृध्द महर्षींना सुध्दा आपले मन आवरता आले नाही हे पाहिले म्हणजे गभस्तिगतीला या कामी यश आले नाही.[१] गभस्तिगतीने मनोनियम करण्याच्या हेतूने गभस्तिगती अध्यापनांत अधिक काळ घालवू लागला व ग्रंथपठणादि उद्योग काढून सुलोचनेचा विचार मनात येण्यास अवकाशच दयावयाचा नाही, असा त्याने निश्चय केला. पण अध्यापन करतांना, अध्ययन करीत असतां, बोलता चालता, खातापिता, जळी-स्थळी, काष्ठी, पाषाणी सगळीकडेच सर्व काली तिची मूर्ति त्याच्या डोळ्यापुढे येऊ लागली. तेव्हा त्याला काय करावे हे सुचेना.

गभस्तिगती प्रमाणे सुलोचनाचीही अवस्था झाली. सुलोचनाही आश्रमहरिणीप्रमाणे मदनवश झाली. सुलोचनाही स्वत:चे मन आवरण्याचा प्रयत्न करीत होती. सुलोचनेनेही आपल्याकडून इंद्रियदमन व मनोनिग्रह करण्याचा प्रयत्न केला परंतु गभस्तिगतीचे तेजस्वी व मोहक मुख तिच्या डोळ्यासमोरून हलेना! धौम्यऋषीशी विवाह करण्यापूर्वी गभस्तिगती का धौम्य ऋषी, या विषयी तिचे मन जसे संशय दोलारूढ होऊन गेले होते, त्यापेक्षा तिचे मन आता अधिकच व्याकुळ झाले! निशास्त समयी संध्येला एकीकडे अस्तंगत चंद्राची जशी पुसट आठवण रहावी आणि दुसरीकडे उदयाचली येऊ पाहणाऱ्या सूर्याचे मधुरतेजोयुत मुख तिच्या दृष्टीस पडू लागावे, तशी तिच्या मनाची स्थिती झाली. पति निधनानंतर विवाह केला तर आपल्याला पाप लागेल असे तिला वाटू लागले. तिच्या मनाची अवस्था द्विधा झाली.

अशा द्विधावस्थेत 'धर्म काय आणि अधर्म काय' या विषयी दोघाचेही मन साशंक होते. गभस्तिगती पूर्वीच सुलोचना कुलपतिकडे जाऊन त्यांना आपली शोचनीय अवस्था सांगते. आणि 'प्राणत्याग करण्याचा माझा विचार आहे.' असे म्हणते. यावर कुलपति व सुलोचना यांच्यातील संवाद :-

'प्राणत्याग करणे हा धर्म नव्हे' कुलपति म्हणाले. 'वासना मेली पाहिजे; शरीर मरून काय उपयोग?' असे त्यांनी सांगितले.

'जिवंत आहे तो पर्यंत वासना मरावयाची नाही तेव्हा मेलेलेच बरे', सुलोचना म्हणाली.

'सुलोचने', कुलपती म्हणाले, 'तुझ्या मनांत विवाहाची वासना आहे ती मरून जावयाची नाही. तुला खरे वैराग्य पाहिजे असेल, व आत्मप्राप्तीची खरी इच्छा असेल तर मनानेच नियमन कर.[१०]'

'पण हे शक्य नसेल तर?' सुलोचनाने विचारले. 'हे शक्य नसेल तर तू पुन: विवाह कर. सुलोचने आपल्या शास्त्रात विधवांना पुन: विवाह करण्यास अनुज्ञा आहे. आपले शास्त्र इतके कठोर नाही. मनात अहोरात्र विवाह विचार व विवाहवासना जर दुर्निवार रीतीने येत असतील तर विधवेने केवळ लोकलज्जेस्तव शरीरास कैद करून किंवा मारून टाकून काय पुण्यलाभ होणार आहे? शिवाय सुलोचने, तुझ्या मनात विवाहेच्छा आहे ती मला पापात्मक वाटतच नाही. त्या वेळेस तू लग्न केलेस त्या वेळीही तुझे या गभस्तिगतीवरच अधिक प्रेम होते. पण त्यावेळी तू आपले खरे सात्विक प्रेम कोणावर आहे हे न ओळखून राजस प्रेमाला बळी पडलीस. जरत्कारू गुरूंचाहि कल धौम्यऋषीकडेच होता म्हणून तुझ्या राजस प्रेमाला जोर करण्यास अवसर मिळाला. अस्तु. गभस्तिगतीचीही तुझ्यासारखीच अवस्था झाली आहे. तुमचा स्वभाव अनुरूप आहे. तुम्ही दोघेजण धर्मशील व सुविनीत आहात. तुमचे मन परस्परांच्या सद्गुणांनी आकर्षण करून घेतलेले आहे, तुमच्या प्रेमात मला तामस अंश मुळीच दिसत नाही. प्रथम विवाहाइतकाच हा पुनर्विवाह मला शुध्द व इष्ट वाटतो. गौण पक्ष

व आपधर्म म्हणून नव्हे तर सत्पक्ष व सधर्म म्हणून पुनर्विवाह करण्यास मी तुला सांगत आहे. सुलोचने माझे ऐकावयाचे असेल तर तूं गभस्तिगतीशी विवाह कर व योग्य काली वैराग्य प्राप्त झाल्यावर तुम्ही दोघेजण वानप्रस्थाश्रम घ्या आणि मग तप करून ब्रह्मपद प्राप्ती करून घ्या. विवाहेच्छा कायम असता आणि विवाहाला सर्व परिस्थिती अत्यंत अनुकूल व उचित असता केवळ लोकांना ही गोष्ट आवडणार नाही या भितीने पुनर्विवाह करण्याचे टाळून तू जर देहावसान करून घेशील ती त्यात विशेष कांही लाभ आहे असे मला वाटत नाही.

अशा प्रकारे कुलपतीने केलेल्या आदेशानुसार जसा पौर्णिमेचा चंद्र कालवश झाल्यावर प्रात:संध्या जशी उदयमान सूर्याच्या स्वाधीन होते, तशी सुलोचना लवकरच गभस्तिगतीची धर्मपत्नी झाली व त्याच्या संगतीत शांत व सात्विक सुखोपभोग घेत कालक्रमणा करू लागली. पण काय कुणास ठाऊक! विधिलिखिताचा खेळ निराळाच असतो. प्रत्येक मनुष्याला कधी कोणत्या जीवनाच्या वळणावर आणून ठेवत हे कधीच कुणाला सांगता येत नाही आणि याचप्रमाणे सुलोचनेच्या नशीबी सुखाचा संसार फार काळ कधीच लाभला नाही. पुनर्विवाह करून गभस्तिगतीच्या रम्य सुखात जीवन जगत असते तेवढ्यात एक विलक्षण घटना घडते.

दिङ्नाग राजाने मातंगाकडून मारले गेलेले धौम्यर्षि मरण पावलेले नसून जिवंत होते. धौम्यर्षि दिङ्नाग राजा मरण पावल्याची वार्ता कळल्यावर तपश्चर्या संपवून जवळ जवळ आठ वर्षानंतर धौम्यर्षि आश्रमात येतात. आश्रमाच्या सभोवतालचा परिसर जसा होता तसा होता. त्याच्याकडे फार लक्ष न देता, प्रिय पत्नीच्या व प्रिय मित्राच्या दर्शनास उत्सुक झालेल्या धौम्यर्षिचा आनंद फार काळ टिकला नाही. धौम्यर्षि आपल्या उटजाजवळ जातात तो एक तीन-चार वर्षाची मुलगी उटजाबाहेरील अल्पशा पुष्पोद्यानात खेळत होती. त्या मुलीला पाहताच धौम्यर्षिना बालपणाची सुलोचना वाटली. ती मुलगी सुलोचनाची असावी अशी त्यांना शंका आली. ही कल्पना आल्यावर त्यांच्या अंगाला घाम सुटला. त्यांचे धैर्य खचले व पाय गळाले. तरीही त्या मुलीला त्यांनी विचारले, 'तुझे नांव काय?, तू कोणाची

मुलगी?' ती मुलगी म्हणाली, 'मी आईची'. या उत्तराने त्यांना तिची आई कोण असावी हे समजले. इतक्यात त्या उटजाजवळून एक लहानसा मुलगा जात आहे असे पाहून धौम्य ऋषी त्याला विचारतात, 'बाळा हे उटज कोणाचे व येथे कोण राहतो?' ते मुल म्हणाले, ' आमचे गुरू गभस्तिगती व त्यांची पत्नी सुलोचना माता येथे राहतात.' हे शब्द ऐकताच धौम्यर्षिंच्या लक्षात सर्व प्रकार आला आणि ते कुलपतिंच्या आश्रमात गेले.

धौम्यर्षिंनी उटजापाशी जो प्रकार पाहिला त्याचे कारण विचारले तेव्हा धौम्यर्षि व कुलपती यांच्यातील संवाद :-

''धौम्य', कुलपती म्हणाले, 'तू विवाह केलास तो आपल्या सुखासाठी का तिच्या सुखासाठी?''

धौम्यर्षि शांत पाहून कुलपती म्हणाले, 'शांत हो, तू अरण्यांत राहून आठ वर्षे तपश्चर्या केलीस तरी विषय सुखाची तुला इच्छा आहेच ना? विषय सुखांत सुख आहे, असे तुला अदयपि वाटते काय?'

'नाही पण माझी पत्नी ---'

तिने पुनर्विवाह केला याच्यात तिचा दोष नाही. मीच (कुलपती) तिला ही गोष्ट करण्यास सांगितले.'

'आपण या गोष्टीला अशी अनुमति दिलीत?' धौम्यर्षि.

'धौम्य तुला सर्व मी सांगतो. शांतपणे विचार कर. सुलोचना ही सच्छील आहे; परंतु तिचे गभस्तिगतीवर लहानपणापासून प्रेम होते; पण राजस प्रेमाने अंध होऊन व पितामहाची इच्छा ही आज्ञा मानून तुझ्याशी विवाह केल्यानंतर हे प्रेम सुप्त झाले. तुझ्या निधनाची वार्ता ऐकल्यानंतर तिने विवेक करून हे प्रेम काही काळ सुप्त ठेवले, पण धौम्य काही वर्षानंतर यौवनाने आणि या प्रेमाने फार उचल केली. मनोनियमन करण्यासाठी तिने हरप्रयत्न करून पाहिले. परंतु गभस्तिगतीची मूर्ति तिला जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी जेव्हां दिसू लागली व तिचा निद्राभंग होऊन नित्य धर्माचरणाकडेही तिचे जेव्हा लक्ष

लागेनासे झाले, तेव्हा मनोनिग्रह करणे अशक्य वाटून तिने प्राणत्याग करण्याचे योजिले. मला ही गोष्ट कळल्यावर मी तिचे निवारण केले व प्राणत्याग करण्यापेक्षा त्याच्याशी विवाहच केलेला बरा, असा तिला उपदेश केला. धौम्य, वासना जिवंत असता केवळ देहनाश केल्याने आत्मशुध्दि होत नाही, हे तू जाणत आहेस. तिची आत्मशुध्दी जुला जर प्रिय असेल तर तू तिला दोष देऊ नकोस. तुझ्याशी एकदा तिने विवाह केला म्हणून तिने आपला देहनाशच नव्हे तर आत्मनाशही करून घ्यावा काय?'

'पण अन्य पति केल्याने आत्मनाश होत नाही का?' धौम्यर्षिंनी रागाने म्हटले.

'नाही' कुलपती आवेशाने म्हणाले, 'या सर्व गोष्टी सारासार विचाराने पाहिल्या पाहिजेत. पण माझे तुला एवढेच सांगणे आहे की, मानव मात्राची सुखप्रवृत्ती कांही काळ दुर्निवाद असते. प्रेमाचे एक माणूस निधन पावले म्हणून सर्वदा दु:खी राहण्यास एखाद्याला सांगणे असमंजसपणाचे आहे. आपल्या मागे राहिलेल्या माणसांनी आपल्या करिता जन्मभर दु:खी रहावे अशी त्या मृत माणसाची सुध्दा इच्छा नसते. मरतांना मातेला असे का वाटत असते की, आपल्या मुलांनी आपल्याकरिता आजन्म शोक करीत रहावे? मरतांना पत्नीला असे का वाटत असते, की आपल्या पतीने सर्व जन्म आपल्या विषयी शोक करण्यांत घालवावा? मग पतीने तरी अशी इच्छा कां धरावी? पत्नीने सुखी व्हावे अशी जर पतीची इच्छा नसेल तर आपण मरण पावल्यावरही आपल्या अल्पवयस्क पत्नीने त्या वयातच सर्वसंगपरित्याग करावा असे दयार्द्र अंत:करणाच्या विवेकी पतीस तरी वाटू नये.'

'पुनर्विवाह केल्याने तिला सुखप्राप्ती होईल; पण तिची आत्मोन्नती होईल असे मला वाटत नाही.' धौम्यर्षि म्हणाले.

'आत्मोन्नतीही होईल' ते आवेशाने म्हणाले अन्य पति केल्याने पातिव्रत्यभंगाचा प्रथम दर्शनी दोष येतो हे मला ठाऊक आहे, पण कित्येक अबलांचे मन त्यांचे स्वाधीन नसते. त्यांनी किती केले तरी प्रबल आणि गीतेत म्हटल्याप्रमाणे 'प्रमाथि' असलेली इन्द्रिये त्याचे मन विकारवश करतात. पण मनाचे नियमन करणे अत्यंत दुर्घट. त्या कर्माने शुध्द राहू

14749
A

शकतात. पण मनांत त्यांना विवाहेच्छा होतेच. जन्मभर त्यांचे शरीर शुध्द पण मन मात्र पापी असते. मनाची ओढ पापवासनेकडे अनावर वाढू लागली म्हणजे खुशाल पापे करावीत असे मी म्हणत नाही आणि कोण म्हणेल? पण 'पाप' कोणतेव कोणते नाही हे पाहिले पाहिजे. पुनर्विवाह हा नित्य पापात्मक आहे असे तुला वाटते काय? प्रथम विवाह ज्या कारणांकरिता शुध्द, पवित्र व आत्मोन्नतिकारक वाटतो ती सर्व कारणे उपस्थित असता आणि पूर्वी एकदा विवाह केला होता व आपण आता विधवा आहोत या जाणिवेशिवाय परिस्थितीत महत्वाचा फरक नसतां, पुनर्विवाह अशुध्द, अपवित्र व अध:पातकारक का मानण्यात यावा हे मला समजत नाही.[१२]'

'तर्कदृष्टया तुमचे म्हणणे बरोबर आहे.' धौम्यर्षिने उत्तर दिले. पण भावना म्हणून कांही पदार्थ आहे किंवा नाही?'

'भावनांना मी महत्व देतो' कुलपती म्हणाले, 'पण भावना कशा उत्पन्न होतात, त्यांना केव्हा किती महत्व दयावे याचाही विचार केला पाहिजे आणि असा विचार करता सुलोचनेच्या सारख्या परिस्थितीत पुनर्विवाह हा व्यक्तिच्या आणि समाजाच्या उन्नतीला प्रतिकूल नसूल अनुकुल आहे.'

'अन्य पति केल्याने आत्मोन्नति होते, असे का आपले म्हणणे?' धौम्यर्षिनी म्हटले.

'होय' ते (कुलपती) म्हणाले, 'क्षुद्र सुखाविषयी खरे वैराग्य प्राप्त होऊन सर्व जगताकडे समतेने व प्रेमदृष्टीने पहाणे आणि तदुन्नतीकरिता उत्साहपूर्वक अहर्निश प्रयत्न करणे याचेच नाव आत्मोन्नती, मनांत अहर्निश सुखोपभोगाचे विचार चालले असून देहदृष्टया स्विकारलेले वैराग्य खरे वैराग्य नव्हे. सर्व विश्व ज्याला कुटुंबाप्रमाणे वाटू लागेल व सर्व भूतांच्या ठायी समदृष्टीने जो पाहू शकेल त्याचेच खरे वैराग्य, ही स्थिती प्राप्त होण्याचे अनेक मार्ग आहेत. विवाह वगैरे न करिता संन्यस्त वृत्तीने राहणे, हा एक मार्ग आहे. पण हा मार्ग फार कठीण आहे. हा कंटकमय मोहगतिमय आहे. या मार्गाने जाऊन यश प्राप्ती करून घेणारे साधु किंवा साध्वी धन्य होत. यात शंका नाही पण याशिवाय सुसाध्य एक मार्ग आहे. सद्गुणांवर

आपले सात्विक प्रेम जडले आहे. ज्याच्या समागमात आपणांस अधिक पवित्र विचार सुचतात, ज्यांचे उदार अंत:करण आपणांसही उदार होण्यास प्रेमाने शिकविते, ज्याची नि:स्वार्थ परहितबुध्दी आपल्या स्वार्थबुध्दीस लाजविते, ज्यांचे ज्ञान आपले अज्ञान पटल दूर करते, ज्याची धर्मप्रवृत्ती आपल्या उच्छृंखल चाललेले उत्साहपूर्ण प्रयत्न आपणांसही तसे करण्यास प्रवृत्त करतात, ज्याची परमुखाने आनंदीत होणारी सात्वीक वृत्ती आपणांस या उच्चतम आनंदाची गोडी लावते. अशा प्रेमपूर्ण सात्वीक पुरूषाशी विवाह करण्याचे एखाद्या कोमल स्वभावाच्या अज्ञान अबलेले मनांत आणले तर तिला पापीणी म्हणण्यास मी तयार नाही'.

'तात्वीकदृष्टया मला वाद करावयाचा नाही, पण माझे समाधान होत नाही' असे धौम्यर्षि म्हणतात.

'होईल कालांतराने तुझेही समाधान होईल', कुलपती म्हणाले. 'धौम्य, ईश्वरी नेमानेम फार विलक्षण आहेत. मनुष्य 'माझे' धन, 'माझी' भार्या इ. गोष्टीचा वृथाभिनान बाळगून स्वत:स उगीच दु:खी करून घेत असतो. मनुष्य आज आहे नि उदयां नाही. 'माझे'घर, 'माझी' पत्नी असे म्हणण्यात अर्थ काय? सुलोचना ही तुझ्या सुखाकरिता का ईश्वराने निर्माण केली आहे? तिच्या आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व नाही का? धौम्य, पूर्वी गभस्तिगतीने तुझ्याकरिता सुलोचनेचा नाद सोडून दिला. त्याने हा प्रेमत्याग त्या तरूण वयात केला. तू आता तपश्चर्या केली आहेस. या वयांत तू सुलोचनेवरचा अधिकार सोडण्यास तयार झाला नाहीस, तर तुझे मन अनुदार व क्षुद्र आहे असे मी म्हणेन. सुलोचनेस तू जर आता दु:ख दिलेस तर सुलोचनेवरील तुझी प्रीति सात्वीक नव्हती, ती स्वसुखार्थ होती असेच मी म्हणेन. 'नवाऽऽरे जायाया: कामाय जायाया: कामाय जाया प्रिया भवति। आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति।' हे उपनिषदातील वाक्यच अखेर खरे म्हणावयाचे ना? धौम्य तू सुध्दा या वाक्याला अपवादभूत होत नाहीस ना? जगांत उच्च आणि निरपेक्ष प्रेम मुळीच नाही असे म्हणावयाचे?'

'गुरूजी, सुलोचनेला दर्शन देऊन तिला मी दु:ख देणार नाही व गभस्तिगतीच्याही सुखात मी माती कालवू इच्छित नाही. त्या दोघांनी सुखाने नांदावे हीच माझी इच्छा आहे. क्षुद्र अहंकार मी आजपासून सोडला. जगात अहेतुक उच्च सात्विक प्रेम आहे हे मी आज सिध्द करून दाखविणार. आपल्या उदात्त उपदेशास आणि उदार उदाहरणास अनुरूप असेच मी चरित्र ठेवीन.'उदार उदाहरणास अनुरूप असेच मी चरित्र ठेवीन.'

'म्हणजे काय?' गुरूजींना विचारले.

'म्हणजे मी येथून निघून जातो', धौम्यर्षि म्हणाले. 'असे करू नको' ते (कुलपती) म्हणाले. सुलोचनेने पहिल्यांदा बघितले की आश्चर्य वाटेल आणि पुन्हा सर्व परिस्थिती ठीक होईल. आणि ते म्हणाले, 'द्रौपदी जशी पाच पांडवांची पत्नी होती तशी ती तुम्हा दोघांची होईल. असे म्हणुन द्विपतिकत्वाचे पालन होईल.' असे कुलपती म्हणाले.

अशा प्रकारे हिरण्यागर्भ राजाला धौम्यर्षि आपली सर्व हकिकत सांगतात आणि नारदाने विचारलेल्या स्त्री धर्म विषयक प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी धौम्य ऋषीने आपली स्वत:ची सर्व हकिकत सांगितले आणि शेवटी म्हणाले आमचा तिघांचा संसार खरोखरीच सुखाचा झाला. सुखाचाच नव्हे ता आत्मोन्नतिकारक झाला. पण मानवशक्तीच्या सृष्टीच्या क्रमाला अनुसरून द्विपतिकत्वाचे अनुकरण न केलेले बरे.[१३] असे ते म्हणतात येथेच कथानक संपते.

अशा प्रकारे 'कुलपती' यांनी मध्यवर्ती भूमिका केलेली आहे. धौम्यर्षि, गभस्तिगती व सुलोचना यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन केले आहे. कुलपती यांची भूमिका समाजसुधारकाची आहे. कुलपती हे शांत व संयमाचे प्रतिक म्हणुन आलेले आहेत.

तत्कालिन समाजातील चाली-रितीचा स्विकार करण्यासाठी पुनर्विवाह व द्विपतिकत्वाचे पालन करण्यासाठी वा.म. जोशी यांनी पौराणिक कथानक कल्पनेने निर्माण करून वास्तवभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशा तऱ्हेने समाजात पुनर्विवाह व द्विपतिकत्व कायदयाचे पालन करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

**संदर्भ टीपा :-**

१. अ.ना. देशपांडे (आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - भाग २) व्हीनस प्रकाशन, पुणे, १९५८; आवृत्ती पहिली, पृष्ठ ६४.

२. तत्रैव, पृ.६५.

३. वा.ल. कुलकर्णी (वामन मल्हार वाङ्मय-दर्शन) प्रकाशक - मराठी साहित्य संघ, सरस्वती, गिरगाव, मुंबई, १९५० आवृत्ती दुसरी, पान ५७.

४. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरीचे पहिले शतक १८५०-१९५०) प्रकाशक - मुंबई मराठी साहित्य संघ – १९७५, आवृत्ती दुसरी. पान १२९.

५. वा.म. जोशी (आश्रमहरिणी) प्रकाशन - मॉर्डन बुक डेपो पुणे. आवृत्ती आठवी.

६. तत्रैव, पृ. ३७

७. तत्रैव, पृ. ४६.

८. तत्रैव, पृ. ५२.

९. तत्रैव, पृ. ६१.

१०. तत्रैव, पृ. ६५.

११. तत्रैव, पृ. ७१.

१२. तत्रैव, पृ. ७४.

१३. तत्रैव, पृ. ७८.